34

# मोराची चिंचोली

## — एक पर्यटन स्थळ

प्रा. शिल्पा शेटे
श्री पद्‌मणि जैन महाविद्यालय, पाबळ
ता. शिरूर, जि. पुणे

***********

प्रत्येक गावाला आपला एक इतिहास असतो. केव्हा केव्हा तो अतिप्राचीन असतो, तर केव्हा अगदी अर्वाचीन असतो. त्याचे काही पुरावे उपलब्ध असतात. ज्यांना आपण 'साधने' असे म्हणतो. बहुतेक गावे प्राचीन आहेत. मात्र तेथे विशेष असे ऐतिहासिक पुरावे सापडत नाहीत. काही गावांत जूनी कागदपत्रे उपलब्ध नसतात. अशावेळी अलिखित साधनांचाच आधार घ्यावा लागतो. उदा. काही जुने वाडे, देवस्थाने, मुर्ती, विहिरी (लाख), वीरगळ, सतीची शीळा इ. या साधनाबरोबरच गावात परंपरेने चालत आलेल्या काही आख्यायिका असतात. याला आपण 'मौखिक इतिहास' म्हणतो. त्यातील अद्भूततेची पुटे दूर केली. तर मौखिक इतिहास या आख्यालिका उपयोगी पडू शकतात. गावात जुन्या काळापासून चालत आलेल्या काही धार्मिक अथवा सामाजिक, सांस्कृतिक परंपरा, श्रध्दा असतात. त्या नेमक्या केव्हा सुरू झाल्या, हे जरी सांगता आले नाही तरी, या परंपरा स्वत:च एक जिवंत इतिहास असतात. म्हणून या अशा काही वेगळया आणि महत्त्वाच्या परंपरा, श्रध्दांचा समावेश येथे इतिहास म्हणून केला आहे.

'चिंचोली मोराची' हे निसर्गरम्य गाव पुणे जिल्हयातील शिरूर तालुक्यात आहे. शिरूरपासून २५ कि.मी. अंतरावर ते असून पुण्याच्या पूर्वेकडे आहे. चिंचोलीला पुण्याहून येण्यासाठी जवळचा मार्ग पुणे ते शिक्रापूर, गणेगाव (खालसा), वरूडे या रस्त्याने येता येते. भिमाशंकर खेड (राजगुरूनगर), पाबळ,कान्हूर, मलठण, शिरूर या रस्त्यावर कान्हूर मेसाई पासून चिंचोली गाव ३ कि.मी. अंतरावर तर या मुख्य रस्त्यापासून १.५ कि.मी. अंतरावर आहे.

चिंचोली या गावात सर्वत्र चिंचेची झाडे आहेत म्हणून या गावाला 'चिंचोली' म्हणतात. तर आपला राष्ट्रीय पक्षी मोर यांचा येथे मुक्तसंचार असतो. म्हणून या गावाला 'चिंचोली मोराची' असे नाव पडले आहे.[१] चिंचोली मोराची हे गाव शसनाने मोरांचे अभयारण्य म्हणून जाहिर केले आहे.[२] मोर हे या गावाचेच नव्हे तर येथिल सर्व परिसरांचे वैभव आहे. मात्र या ठिकाणी मोरांचे केव्हापासून वास्तव्य आहे याची निश्चित माहिती गावक—यांना नाही. मोराची चिंचोली हे गाव एक प्रसिध्द पर्यटनस्थळ म्हणून प्रसिध्द आहे.

### गावातील भग्न अवशेष —

### गाववेस —

गावठाणात प्रवेश करतानाच भग्न अवस्थेतील वेस आहे. ही वेस भव्य असून ती दगडाच्या तोडी व विटांनी बांधलेली आहे. या वेशीची रूंदी सहा ते सात फूट असल्याचे दिसते. या वेशीच्या बाजूने पूर्ण गावाला तटबंदी होती. ती आता नामशेष झाली असली, तरी तिचे अवशेष काही ठिकाणी, शिल्लक आहेत. वेशीच्या प्रवेश द्वारावर दोन्ही बाजूंनी वरच्या बाजूला दोन दगडांत कोरलेली चक्रे आहेत. त्याना सहा आ—या आहेत. वेशीला पूर्वी दरवाजे असावेत, हे त्यांच्या अवशेषांवरून दिसते.

### पलांडे यांचा वाडा —

गावामध्ये एक भव्य असा दगडी बांधकामातील वाडा आहे. मात्र हा वाडा आता भग्न स्वरूपात आहे. सरदार पलांडे यांचा हा वाडा होता. तो पुढे नाणेकरांनी घेतला. अशी माहिती ग्रामस्थांनी दिली.[३] हे सरदार पलांडे कोण होते? किंवा हा वाडा केव्हा बांधला गेला? याविषयी माहिती मिळत नाही. यावाडयाच्या ज्या भिंती आता शिल्लक आहेत, त्यावरून वाडयाच भव्यता लक्षात येते. साधारणपणे वाडयाच्या भिंतीची रूंदी पाच फूट तर उंची १५ फूटांच्या आसपास आहे. २०० बाय २०० फूट असे या वाडयाचे क्षेत्रफळ आहे. वाडा दगड आणि पांढऱ्या मातीमध्ये बांधलेला आहे. वाडयामध्ये काही खोल्याही आहेत. मात्र सध्या या वाडयाच्या, दोन बाजूंच्या भिंती, उभ्या असल्या



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

तरी दोन बाजूंच्या भिंती पूर्णपणे जमीनदोस्त झाल्या आहेत. आतमध्ये पूर्णपणे गवत व झुडूपे उगवली आहेत. मात्र वाडयात विहिर कोठेच आढळली नाही. कदाचित ती बुजली असावी. गावकरी आपली जनावरे तेथे बांधतात. तर गावकरी घरे सारविण्याकरिता या वाडयाची माती भरून नेतात. दरवाजे व इतर लाकडी वस्तू अजिबात दिसत नाही.

**ब्राम्हणवाडा —**

पलांडे यांच्या वाडयाच्या समोरच ब्राम्हणवाडा आहे. हा वाडाही भग्न स्वरूपात आहे. हा वाडा दगड आणि विटा यामध्ये बांधलेला असून वाडयाच्या कमानी वाडयाची शोभा वाढवतात. आंतील भागातही भिंतीमध्ये व कोनाऱ्यात कलाकुसर बनवलेली आहे. मात्र या वाडयातही आतमध्ये पूर्णपणे गवत व झुडूपे उगवलेली आहेत. वाडयात आतमध्ये एक चौकोनी आकाराची विहिर (बारव) किंवा कुंड आहे. त्यामध्ये पाणी आहे. मात्र ती पूर्णपणे झाडांनी झाकलेली असल्याने तो नक्की किती खोल आहे. याचा अंदाज येत नाही. ग्रामस्थांच्या माहितीनुसार या वाडयात प्रथम गावातील मारवाडी राहत असत. नंतर ते सर्व तेथून निघून गेले. त्यांपैकी काही पावळ या गावी वास्तव्य करतात, अशी माहिती ग्रामस्थांनी दिली.[४] या वाडयाला ब्राम्हणवाडा का म्हणतात यांचे उत्तर मात्र मिळत नाही.

**गावातील आख्यायिका व मंदिरे —**

**श्री म्हाळसाकांत —**

गावामध्ये श्री खंडोबादेवाचे मंदिर आहे. हे चिंचोलीचे ग्रामदैवत आहे. 'श्री म्हाळसाकांत' असे या देवस्थानाचे नाव आहे. या मंदिराविषयी विविध कथा गावकरी सांगतात. एका ग्रामस्थाने दिलेल्या माहितीनुसार हे मंदिर १६७४ साली बांधलेले असून ते हेमाडपंथी आहे.[५] या देवस्थानाविषयी अशी कथा सांगितली जाते की, सुमारे ३५० वर्षापुर्वी या गावातील नाणेकरांच्या घराण्यातील एक गृहस्थ (खंडेराय भक्त) खंडोबाची निष्ठेने भक्ती करत असे. तो रोजकाळी कपिला गायचे दूध काढून जेजूरी येथील महाराष्ट्रातील कुलदैवत खंडोबाला जाऊन दूधाने अभिषेक करत असे. तो घोडयावरून जात असे मात्र पुढे तो वृध्द झाल्याने त्याला रोज खंडोबाला जाणे —येणे अशक्य झाले. त्याची भक्ती पाहून खंडेरायाने त्यांच्या स्वप्नात येऊन त्यांना दृष्टांत दिला व सांगितले की तू आता यापुढे जेजूरीला येऊ नकोस, मीच तुझ्यासाठी चिंचोली येथे येतो. देवाने त्यांना सांगितले की, तुमच्या गावामध्ये गावाबाहेर टेकडीवर एक 'ळळयीचे' झाड आहे. त्या झाडाखाली एक कपिली गाय बसलेली असेल आणि त्या गायीचे शेण उचलल्यानंतर तुला भंडार सापडेल व त्याच ठिकाणी काही दिवसांनी लिंग मिळतील, तेव्हा ते पहा व मी येथेच आहे असे समजून माझ्या लिंगाची भक्तीपूर्वक सेवा कर. तेव्हापासून तेथे असलेल्या तो ग्रामस्थ भक्ती करू लागला, अशा पध्दतीने गावात 'श्री खंडेराय' स्वतःच आले व त्या लिंगावरच सुमारे १६७४ साली शिवकालीन हेमाडपंथी मंदिर बांधले आहे. त्याचा अलिकडे पुन्हा जिर्णोध्दार केलेला आहे.[६]

या मंदिराचा मुख्य गाभारा लहान असून आत खंडोबा, म्हाळसा व बाणू यांच्या मूर्ती आहेत. मंदिराचा मंडप मोठा आहे. जवळ जवळ ६० x ५० फूट क्षेत्रफळाचा मोकळा चौक येथे आहे. तो आधुनिक पध्दतीने बांधलेला आहे. मंदिराचा कळस उंच असून कळसावर विविध संतांचे वादये वाजवितानाचे फोटो व पौराणिक कथा त्यांनी तो सुशोभित केलेला आहे. मंदिराबाहेर दोन मोठे भव्य दिपस्तंभ उभे आहेत.

नाणेकरांच्या भक्तीमुळे देव गावात आलेला असल्याने व देवाला दूधाची अंघोळ घालीत असल्याने चिंचोली या गावात दुधाचा व्यवसाय केला जात नाही. दुधाची विक्री करण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्या व्यक्तीच्या घरात काहीतरी संकट येतेच, अशी येथील ग्रामस्थांची श्रध्दा आहे. गावात शेतीला पुरक दुग्ध व्यवसाय अथवा दूध डेअरी नाही. या मंदिरातील देवाची पूजा अर्चा गावातील करंजेकर हे गुरव वंशपंरपरेने करतात.

**श्री लक्ष्मी कनेश्वर मंदिर —**

गाववेशीच्या आतमध्ये डावीकडे कामिनी ओढयाच्या किनारी 'श्री लक्ष्मी कनकेश्वराचे' (महादेवाचे) जागृत मंदिर आहे. ते मंदिर ही १०० वर्षापूर्वी बांधले असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.[६] या मंदिराच्या प्रवेश द्वारावर मंदिराची स्थापना शके १८५६, इ.स.



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

१९३४ मध्ये बांधल्याचा उल्लेख आहे. मंदिराची पडझड झाल्यामुळे ग्रामस्थांनी भक्तीभावाने वर्गणी गोळा करून मंदिराच्या कळसाचे व तटबंदिचे काम पूर्ण केले आहे. मंदिरामध्ये मोकळे हवेशीर मोठा चौक असून तो साधारणपणे ५० x ४० फूट आकाराचा असावा. गाभारा दगडात बांधलेला असून मंदिराचा कळस नागर पध्दतीचा आहे. मंदिराच्या छपरावर कळसाच्या खाली 'उगवत्या सूर्याची प्रतिके' दाखविलेली आहेत. मंदिराच्या बाजूला मोठा अत्यंत जूना असा पिंपळवृक्ष असून दुसऱ्या बाजूला दगडात बांधलेली बारव आहे.

**हनुमंत मंदिर —**

लक्ष्मी कनेश्वर मंदिराच्या हाताला समोर हनुमंत (मारूती) हे जुने मंदिर आहे. या मंदिराचे वैशिष्टये म्हणजे हे मंदिर गाववेशिच्या आत आहे. हे मंदिर माती विटांमध्ये बांधलेले असून वर सिमेंटचे प्लास्टर आहे. मंदिर कौलारू आहे.

**सामाजिक रचना —**

गावामध्ये बहुतेक लोकांचा व्यवसाय शेती आहे. येथील लोक अतिशय कष्टाळू व आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक आहेत. मात्र शेतीचेपिक निसर्गावर अवलंबून आहे व ते बेभरवाशाचे आहे. ज्वारी, बाजरी ही महत्वाची पिके तसेच कांदा, बटाटा, गहू ही महत्वाची पिके घेतली जातात.

गावात नाणेकर आडनावांचीच मंडळी जास्त आहेत. नाणेकर हे मुळचे मावळातील असावेत. पोट भरण्यासाठी ते चिंचोलीत आले व तेथीलच रहिवाशी बनले. अशी माहिती गावातील काही ग्रामस्थांनी दिली. याशिवाय थोपटे, धुमाळ, उकिर्डे आडनावांची मंडळी आहेत.

पूर्वी गावात बुलतेदारी व आलुतेदारी पध्दती होती. आता ती संपुष्टात आली आहे. गावात सर्वजातींचे रहिवाशी आहेत.

**गावातील विविध उत्सव / यात्रा —**

चिंचोली मोराची या गावात विविध यात्रा आणि उत्सव भरतात. त्यात चंपाषष्ठी यात्रा महोत्सव, पौष पोर्णिमा माघ पोर्णिमा श्री फकिरबाबा यात्रा, पठाणबाबा यात्रा भरतात. याशिवाय महाशिवरात्रीच्या निमित्ताने श्री कनकेश्वराच्या मंदिरामध्ये चार दिवस श्री तुकाराम महाराज गाथेचे पारायण केले जाते. तसेच गोकुळाष्टमीच्या दिवशी आठ दिवस हनुमंत मंदिरामध्ये हरिनाम सप्ताह असतो.

**आधुनिक काळात झालेले बदल —**

आधुनिक काळात येणाऱ्या भौतिक सुविधा व वैज्ञानिक प्रगतीची वाटचाल गावात झाली आहे. रूढी, परंपरा प्रथा बदलू लागल्या आहेत.

चिंचोली गावातील एक महत्वाचे वैशिष्ट व या गावाचे भूषण म्हणजे या गावातील 'जय मल्हार' कृषी विकास प्रतिष्ठाण' नावाची स्वयंसेवी संस्थ होय. प्रतिष्ठाणचे विदयमान अध्यक्ष ॲड. देवराम अण्णा गोरडे यांनी गावामधील 'आंबराई' या जागेचा कायापालट केला आहे. या ठिकाणी त्यांनी अत्यंत अप्रतिम पर्यटनस्थळ उभे केले आहे. याठिकाणी पुष्कळ पर्यटक दूरवरुन मोर पाहण्यासाठी येतात.

गावामध्ये अनेक धार्मिक व सामाजिक मंडळे, भजनी मंडळे कार्यरत आहेत. गावात तरूण मित्र मंडळे आहेत. अनेक महिला बचतगट कार्यरत आहेत. पूर्वी गावात लेझीम,चेंडू, लिंगोरी, विटीदांडू, कुस्ती यासारखे खेळ खेळले जात असत. ते आता फारसे आढळत नाहित. आता क्रिकेट व बास्केट बॉल ने ती जागा घेतली आहे.

अशा पध्दतीने मोराची चिंचोली हे गाव आता नविन रूप धारण करून मोठे पर्यटन स्थळ म्हणून विकसित झाले आहे.

**संदर्भ व टिपा —**

१. मा.श्री महेश गोरडे यांची मुलाखत
२. कित्ता
३. श्री बाळासाहेब नाणेकर यांची मुलाखत
४. श्री राजाराम पंढरीनाथ नाणेकर यांची मुलाखत.
५. श्री सोनला भाऊ नाणेकर यांची मुलाखत
६. कित्ता
७. श्रीमती बबुबाई बाबूजी साकोरे यांची मुलाखत

❑❑❑



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE * Pabal Tal.Shirur, Dist.Pune.
PRINCIPAL
Shri Padmamani Jain
Arts & Commerce College
Pabal, Tal.Shirur, Dist.Pune.412403